मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# भाजपचा दुसरा नगरसेवक बिनविरोध

## महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादीला धक्का; प्रभाग 10 मधून सुप्रिया चांदगुडे विजयी

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला मोठा धक्का बसला. प्रभाग सहामधील उमेदवाराने अर्ज न भरल्याने भाजपचे रवी लांडगे बिनविरोध निवडून आल्यानंतर आता प्रभाग क्रमांक दहा शाहूनगर, संभाजीनगर मधील पक्षाच्या अधिकृत उमेदवाराने माघार घेतल्याने भाजपच्या सुप्रिया चांदगुडे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. निवडणुकीपूर्वीच भाजपचे दोन नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत.



प्रभाग क्रमांक दहा शाहूनगर, संभाजीनगर, एचडीएफसी कॉलनी, इंदिरानगर, दत्तनगर, विद्यानगर, लालटोपीनगर, अमृतेश्वर कॉलनी, म्हाडा कॉलनी, मोरवाडीमधील नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला या 'ब' जागेसाठी भाजपकडून सुप्रिया चांदगुडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसने वर्षा भालेराव यांना उमेदवारी दिली. त्यांनी अर्जही दाखल केला होता. परंतु, शुक्रवारी माघारीच्या मुदतीत भालेराव यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला.

त्याचबरोबर मनसेच्या गीता चव्हाण, अपक्ष रेणुका भोजने, रोहिणी रासकर यांनीही आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे सुप्रिया चांदगुडे यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. सुप्रिया चांदगुडे या उद्योजक उमेश चांदगुडे यांच्या भावजय आहेत. मागील निवडणुकीत सुप्रिया यांचा पराभव झाला होता. यावेळी त्यांची बिनविरोध निवड झाली आहे.

### प्रभाग दहामध्ये आता भाजपचे तीन उमेदवार

» प्रभाग क्रमांकदहा मधील सुप्रिया चांदगुडे यांची बिनविरोध निवड झाल्याने आता भाजपचे तीन उमेदवार रिंगणात असणार आहेत. विधानपरिषद आमदार अमित गोरखे यांच्या आई अनुराधा गोरखे, माजी महापौर मंगला कदम यांचे चिरंजीव कुशाग्र कदम आणि माजी उपमहापौर तुषार हिंगे हे निवडणूक रिंगणात आहेत.

# सत्ता द्या, सगळ्या भ्रष्टाचाराची चौकशी लावतो; अजित पवार

## महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पत्रकार परिषदेत भाजप विरोधात तोफ डागली

**पिंपरी | प्रतिनीधी**

टेंडरमध्ये रिंग, प्रत्येक ठिकाणी दादागिरी, निविदांचा फुगवटा, टेंडरमध्ये खडाखोड जादा दराने प्रत्येक वेळी काम देणे, सल्लागारांची नियुक्ती ,महापालिकेच्या प्रारुप विकास आराखड्यामध्ये घातलेला गोंधळ या सर्वांची माझ्याकडे पुराव्यांशी माहिती आहे. आमच्या हातात सत्ता द्या या सगळ्या भ्रष्टाचाराची चौकशी लावतो असे राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार पिंपरी येथे म्हणाले.



पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन भाजपवर तोफ डागली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शहराध्यक्ष तथा माजी महापौर योगेश बहल, शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष तुषार कामठे, माजी आमदार विलास लांडे, माजी स्थायी समिती अध्यक्ष अजित गव्हाणे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे आधी उपस्थित होते.

यावेळी अजित पवार म्हणाले पिंपरी चिंचवड मध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळला आहे रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे अनेक कामांमध्ये वारंवार दरवाढ देत भ्रष्टाचार करण्यात आला आहे. अजित पवार पुढे म्हणाले टेंडर मध्ये रिंग केली जाते दादागिरी करून कामे ठराविक व्यक्तींनाच दिली जातात निवेदन मध्ये प्रचंड फुगवता निर्माण करून टेंडर मध्ये खाडाखोड करून कामे बळकवली जातात.रस्त्यांच्या अलीकडे पलीकडे अशाप्रकारे कामांची वर्गवारी केली जाते आणि आपल्या जवळच्या लोकांना कामी दिली जातात काही लोकांच्या गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात प्रॉपर्टी कशा वाढल्या यांची कुठे इंडस्ट्री आहे असे देखील अजित पवार म्हणाले.

कोरोना काळातील कुत्र्यांच्या नसबंदीचा मुद्दा देखील अजित पवार यांनी उपस्थित केला. 7 हजार 145 कुत्र्यांची नसबंदी केली. यामध्ये 71 लाख रुपये अदा करण्यात आले आणि तरीदेखील गेल्या ऑक्टोबर महिन्यापर्यन्त 20 हजार जणांना कुत्रे चावले असल्याची पालिकेची आकडेवारी आहे, मग नसबंदी झालेले कुत्रे गेले कुठे असा सवाल देखील पवार यांनी उपस्थित केला.

### पिंपरी चिंचवडमध्ये खोदाई माफिया फोफावला

» अजित पवार म्हणाले, अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली रस्त्यांची वाट लावण्यात आली आहे. अनेक रस्त्यांवर अतिक्रमण झाले असून तिथे उघडपणे हफ्तेखोरी सुरू आहे. गेल्या नऊ वर्षांत भाजपच्या सत्ताकाळात असा विकास झाला आहे. टेंडरमध्ये रिंग करून दादागिरीने पैसे लाटले गेले. स्थानिक आमदार आणि पदाधिकाऱ्यांच्या संपत्ती कशा वाढल्या, पैसा कुठून आला, याची चौकशी झालीच पाहिजे. महापालिकेवर टीका करताना त्यांनी सांगितले की, सत्तेची मस्ती, माज आणि नशा भाजपला आली आहे. कुत्र्यांच्या नसबंदीतही पैसे खाल्ले गेले. महापालिका अक्षरशः भ्रष्टाचाराने पोखरली गेली आणि कर्जबाजारी करण्यात आली. पिंपरी चिंचवडमध्ये खोदाई माफिया फोफावला असून जिओ, एअरटेल, व्होडाफोनसारख्या कंपन्या राजरोसपणे रस्ते खोदत आहेत. शहरात दिवसाढवळ्या लुटारूंची टोळी वावरत आहे, असा आरोपही अजित पवारांनी केला.

# पुणे ग्रँड टूर 2026 साठी महानगरपालिका सज्ज

## 60 दिवसांत 52 कि.मी. आंतरराष्ट्रीय दर्जाचा सायकलिंग मार्ग विकसित



> पुणे ग्रँड टूर २०२६ ही केवळ सायकलिंग स्पर्धा नसून, पिंपरी चिंचवड शहराच्या पायाभूत सुविधा, नियोजन क्षमता आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची कामे वेळेत पूर्ण करण्याची क्षमता दाखवणारा प्रकल्प आहे. अत्यंत मर्यादित कालावधीत ५२ किलोमीटरचे रस्ते यु.सी.आय मानकांनुसार विकसित करणे हे मोठे आव्हान होते. मात्र महापालिकेच्या अभियंता टीमने आणि सर्व संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून हे काम गुणवत्तेसह पूर्ण केले. या रस्त्यांचा लाभ स्पर्धेनंतरही नागरिकांना सुरक्षित आणि खड्डेमुक्त प्रवासासाठी दीर्घकाळ मिळणार आहे.
>
> – श्रावण हर्डीकर, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे जिल्हा व पिंपरी चिंचवड शहरातून जाणाऱ्या पुणे ग्रँड टूर २०२६ या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने अवघ्या ६० दिवसांत ५२ कि.मी. लांबीचा सायकलिंग मार्ग आंतरराष्ट्रीय दर्जाचा व यु.सी.आय (युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनल) मानकांनुसार विकसित करून सज्ज केला आहे. पुणे ग्रँड टूर या आंतरराष्ट्रीय स्पर्धेची घोषणा सप्टेंबर २०२५ मध्ये झाली होती. मर्यादित कालावधीत रस्त्यांची पुनर्बांधणी, दर्जा नियंत्रण आणि आंतरराष्ट्रीय मानकांची पूर्तता करणे हे मोठे आव्हान होते. मात्र जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्या समन्वयाने ऑनलाइन ट्रॅकिंग सिस्टीम व नियमित आढावा बैठका घेऊन हे काम वेळेत पूर्ण करण्यात आले.

पुणे ग्रँड टूर ही एकूण ४३७ कि.मी. लांबीची आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धा असून, त्याचे ४ स्टेजेस आहेत त्यापैकी स्टेज-१ व स्टेज-४ मधील ५२ कि.मी. लांबीचा मार्ग पिंपरी चिंचवड शहरातून जातो आणि स्टेज-१ चा समारोप डी वाय पाटील कॉलेज आकुर्डी येथे होणार आहे.या मार्गावरील रस्ते यु.सी.आय (युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनल) आणि सी.एफ.आय (सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया) यांनी निश्चित केलेल्या आंतरराष्ट्रीय मानकांनुसार विकसित करण्यात आले आहेत. या प्रकल्पासाठी सुमारे ६१.४० कोटी रुपये खर्च करण्यात येणार असून, रस्त्यांची कामे तीन स्वतंत्र भागांमध्ये विभागून कंत्राटदारांना ६० दिवसांची मुदत देण्यात आली होती.

अंदाजपत्रक तयारीपासून पारदर्शक निविदा प्रक्रिया व प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत सर्व टप्पे केवळ तीन महिन्यांत पूर्ण करण्यात आले. सायकलिंगसाठी आवश्यक असलेला २ ते २.५ मीटर/किलोमीटर राईड क्वालिटी निर्देशांक (आयआरआय) साध्य करण्यासाठी सर्व रस्त्यांचे डांबरीकरण/री- सर्फेसिंग करण्यात आले. शहरातील मुख्य मार्गांवर असलेल्या ५०० हून अधिक युटिलिटी चेंबर्स रस्त्याच्या पृष्ठभागाशी समतल करणे हे मोठे तांत्रिक आव्हान होते. यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मॅनहोल व चेंबर्ससाठी नवीन मानक कार्यपद्धती (एसओपी) विकसित करून अंमलात आणली. सुरक्षित सायकलिंगमुळे या कामाला नागरिक व तज्ज्ञांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, ही मानक कार्यपद्धती आता शहरातील इतर रस्त्यांवरही लागू करण्यात येत आहे.

रस्त्यांच्या कामादरम्यान पाणीपुरवठा, ड्रेनेज, वीज, सीसीटीव्ही केबल्स अशा विविध भूमिगत सुविधांचा समन्वय साधण्यात आला. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी रात्रीच्या वेळेत कामे करण्यात आली असून, वाहतूक पोलिसांच्या समन्वयाने आवश्यक बदल करण्यात आले. याशिवाय फुटपाथ दुरुस्ती करणे, गतिरोधक व रंबल स्ट्रिप्स काढून टाकणे, कर्ब व दुभाजक रंगविणे, आंतरराष्ट्रीय दर्जाची रस्ता चिन्हे, पेंट मार्किंग करणे, सिग्नल नूतनीकरण तसेच शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी भित्तीचित्रे, सायकल शिल्पे, सायकल स्टँड, बस स्टॉप, झाडे व झुडपे लावण्याची कामे करण्यात आली आहेत.

स्थापत्य अभियांत्रिकी विभागाची संपूर्ण टीम, अभियंते, कंत्राटदार व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या २४X७ कार्यपद्धतीतून अवघ्या ६० दिवसांत हा महत्त्वाचा प्रकल्प अंतिम टप्प्यात आणण्यात आला आहे. पुणे ग्रँड टूर अंतर्गत विकसित झालेले हे रस्ते पुढील अनेक वर्षे नागरिकांना सुरक्षित व खड्डेमुक्त प्रवास देतील. त्याचबरोबर भविष्यात अशा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्याची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची क्षमता या प्रकल्पातून अधोरेखित झाली आहे.

# लोकशाहीच्या ज्वालेला प्रज्वलित करणारी अग्निशमन विभागाची मतदान जनजागृती रॅली!

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने स्वीप उपक्रमांतर्गत करण्यात आले आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

सायरनचा आवाज, लाल रंगाची धावती वाहने आणि लोकशाहीचा संदेश... या अनोख्या संगमातून पिंपरी चिंचवड शहरात आज अग्निशमन विभागाची मतदान जनजागृती रॅली उत्साहात पार पडली. या रॅलीच्या माध्यमातून ज्वाला विझवणाऱ्या हातांनी आज लोकशाही प्रज्वलित करीत मतदानाचा संदेश दिला. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ही मतदान जनजागृती रॅली शहरात लक्षवेधी ठरली.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली राबविण्यात येत असलेल्या स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती उपक्रम शहरातील विविध भागांत राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत आज महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या वतीने मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली.

निगडी येथील भक्ती शक्ती चौकातून सुरू झालेल्या या रॅलीमध्ये अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे, व्यंकटेश दुर्वास, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह अग्निशमन विभागाचे जवान व नागरिक सहभागी झाले होते. या रॅलीमध्ये अग्निशमन विभागाच्या एकूण १४ अत्याधुनिक वाहनांचा समावेश होता. यामध्ये ५ देवदूत वाहने, ५ फायर बाईक, १ इसुझू वाहन, १ वॉटर मिस्ट, १ एएलपी (ALP) तसेच १ वॉटर ब्राऊझर यांचा समावेश होता. या सर्व वाहनांवर मतदान जनजागृतीचे संदेश झळकत होते. यावेळी 'मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो...', 'मतदान हा तुमचा अधिकार आहे...', 'येत्या १५ जानेवारीला महापालिका निवडणुकीत नक्की मतदान करा...' अशा घोषणांद्वारे नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली.



निगडी भक्ती शक्ती येथून सुरू झालेली ही रॅली खंडोबा चौक, चिंचवड स्टेशन, पिंपरी चिंचवड महापालिका मुख्य प्रशासकीय इमारत, संत तुकाराम नगरमार्गे नाशिक फाटा येथे पोहोचली. त्यानंतर नाशिक फाटा येथून पुन्हा संत तुकाराम नगरमार्गे पिंपरी चिंचवड महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीपर्यंत रॅली आली. रॅलीदरम्यान रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक मताचे असलेले मोल, मतदान न केल्यास होणारे परिणाम तसेच जबाबदार नागरिक म्हणून मतदान करण्याची गरज याबाबत जनजागृती करण्यात आली.

### पथनाट्य, फ्लॅश मॉबचे सादरीकरण

» पिंपरी चिंचवड महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये या मतदान जनजागृती रॅलीचा समारोप झाला. याप्रसंगी महापालिका अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त अण्णा बोदडे, व्यंकटेश दुर्वास, सीताराम बहुरे, संदीप खोत, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित नागरिकांसाठी मतदान जनजागृती पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. तसेच फ्लॅश मॉबद्वारे प्रभावी संदेश देण्यात आला. पंकज सोनी, ऋतुजा खामकर, ईशा दहिवाळ, भूमी पलांडे, स्वरा परभाणे, काव्या पाटील, संचिता कांबळे यांनी फ्लॅश मॉबचे सादरीकरण केले.

# राज्यभरात मुंबईलाही मागे टाकत पुणे अव्वल...

## राज्यात 2025 मध्ये वाहन नोंदणीत मोठी वाढ झाली असून मुंबईला मागे टाकत पुणे अव्वल ठरले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात २०२५ मध्ये सुमारे ३२.७८ लाख नवीन वाहनांची नोंदणी झाली असून २०२४ च्या तुलनेत १३.५५ टक्क्यांनी ही वाढ झाली आहे. यामध्ये मुंबईला मागे टाकून पुण्यात ३.३१ लाख नवीन वाहने खरेदी करण्यात आली असल्याची नोंदणी परिवहन विभागाच्या आकडेवारीतून समोर आली आहे. राज्यात २०२५ मध्ये वाहन नोंदणीत मोठी वाढ झाली असून मुंबईला मागे टाकत पुणे अव्वल ठरले आहे. मात्र, दुचाकी व कार वाढल्याने वाहतूक कोंडी आणि सार्वजनिक वाहतुकीची कमतरता अधोरेखित झाली आहे.

दरम्यान, केंद्र सरकारने शेवटच्या टप्प्यात वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) कमी केल्याने वाहनांच्या विक्रीत वाढ झाली. परिवहन विभागाने राज्यातील प्रमुख शहरांमधील दिलेल्या आकडेवारीनुसार, नवीन वाहनांमध्ये दुचाकी वाहनांची संख्या २२.९२ लाख आहे. त्यानंतर ५.०५ लाख कार, १.४६ लाख कृषी आधारीत ट्रॅक्टर, १.३५ लाख अवजड वाहने, ८८ हजार ३५२ रिक्षा, ५७ हजार १५९ इतर वाहने आणि १३ हजार ३४६ बस असे एकूण ३२.७८ लाख वाहने केवळ २०२५ मध्ये नव्याने घेण्यात आली आहेत. २०२४ मध्ये २८.८७ लाख नवीन वाहनांची नोंदणी करण्यात आली होती.

पुणे शहरात गेल्य वर्षभरात २.११ लाखांहून अधिक दुचाकींची नोंदणी झाली आहे. कार आणि इतर चारचाकी ७४,८१४ इतकी संख्या नोंदवली गेली. प्रामुख्याने ऑक्टोबर-नोव्हेंबर या महिन्यांमध्ये राज्यभरात ८.५६ लाख वाहनांची नोंदणी झाली, जी इतर महिन्यांच्या तुलनेत अधिक आहे, असे परिवहन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले. २०२४ च्या तुलनेत १३.५५ टक्क्यांनी ही वाढ झाली आहे. यामध्ये मुंबईला मागे टाकून पुण्यात ३.३१ लाख नवीन वाहने खरेदी करण्यात आली असल्याची नोंदणी परिवहन विभागाच्या आकडेवारीतून समोर आली आहे. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांबरोबरच पुणे, मुंबई, नागपूरसारख्या शहरांमध्ये महानगर प्राधिकरणांतर्गत (पीएमआरडीए, एमएमआरडीए) राज्य आणि केंद्र शासनाकडून मोठ्या प्रमाणात रस्ते विकासांतर्गत पायाभूत सुविधांचा विकास करण्यात येत आहे.




### दुचाकींमध्ये भर

» वाहन खरेदीतील नागरिकांचा मोठा कल दुचाकींकडे असल्याचे आकडेवारीतून झाले. पुणे शहरात गेल्य वर्षभरात २.११ लाखांहून अधिक दुचाकींची नोंदणी झाली आहे. कार आणि इतर चारचाकी ७४,८१४ इतकी संख्या नोंदवली गेली. प्रामुख्याने ऑक्टोबर-नोव्हेंबर या महिन्यांमध्ये राज्यभरात ८.५६ लाख वाहनांची नोंदणी झाली, जी इतर महिन्यांच्या तुलनेत अधिक आहे, असे परिवहन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.

### लाखांहून अधिक नोंदणी झालेले आरटीओ

- » पुणे – ३,३१,४८८
- » मुंबई – ३,२०,०००
- » पिंपरी-चिंचवड – २,१७,७२८
- » नाशिक – १,४२,६३३
- » ठाणे – १,१७,७०५
- » वसई – १,०४,७२८
- » कल्याण – १,०२,९५३

“ राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांबरोबरच पुणे, मुंबई, नागपूरसारख्या शहरांमध्ये महानगर प्राधिकरणांतर्गत (पीएमआरडीए, एमएमआरडीए) राज्य आणि केंद्र शासनाकडून मोठ्या प्रमाणात रस्ते विकासांतर्गत पायाभूत सुविधांचा विकास करण्यात येत आहे. मात्र, प्रामुख्याने मेट्रो तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सार्वजनिक वाहूतक व्यवस्थेतील बस सुविधांना बळकटी देण्याची गरज आहे. तरच शहरांमधील वाहतूक कोंडी कमी होईल.

**- अमित परांजपे, वाहतूक अभ्यासक**

“ मुंबई, पुणेसारख्या शहरांमधील रस्त्यांवर कमीतकमी वाहने रस्त्यावर येतील यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे बळकटीकरण करणे अनिवार्य आहे. नागरिकांनी पायी चालण्यासाठी स्वतःहून प्रवृत्त होणे गरजेचे आहे. त्यासाठी पादचारी रस्ते अतिक्रमणमुक्त करून द्यावे.

**- रणजीत गाडगीळ, संचालक**

---

# राष्ट्रवादी काँग्रेसमधील गुन्हेगार उमेदवारांबाबत केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे मोठे विधान

## आगामी महापालिका निवडणुकीसाठी शहर भाजपच्या वतीने 'माध्यम कक्षा' चे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांच्या हस्ते झाले.

**पुणे | प्रतिनिधी**

'शहरातील गुन्हेगारी संपली पाहिजे, असे पालकमंत्री अजित पवार सांगतात. मात्र, त्यांच्या पक्षाची उमेदवारी यादी पाहिली तर, ते कोणत्या तत्वामध्ये बसते, हे अजित पवार यांनी सांगावे,' अशा शब्दात केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी गुन्हेगारांच्या कुटुंबांमध्ये उमेदवारी देण्याच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या निर्णयावरून टीका केली. मात्र, भारतीय जनता पक्षाने दिलेल्या रोहिदास चोरघे यांच्या पत्नी प्रतिभा या अनेक वर्षे सामाजिक कार्यात आहेत. त्यांच्यावर कोणताही गुन्हा नाही, अशी सारवासारवही मोहोळ यांनी केली.

आगामी महापालिका निवडणुकीसाठी शहर भाजपच्या वतीने 'माध्यम कक्षा' चे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांच्या हस्ते झाले. त्यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर केली. राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, प्रवक्ते केशव उपाध्ये, भाजप सरचिटणीस राजेश पांडे माजी मंत्री दिलीप कांबळे, भाजप प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, माजी आमदार योगेश टिळेकर, माजी आमदार जगदीश मुळीक यावेळी उपस्थित होते.

दरम्यान, शिवसेनेबरोबरच्या युतीसाठी अजूनही आग्रही असल्याची भूमिकाही मोहोळ यांनी मांडली. ते म्हणाले,' गेल्या निवडणुकीत भाजपचे १०५ नगरसेवक निवडून आले होते. त्यानंतरही शिवसेनेबरोबर युती करण्याची भाजपची भूमिका होती. शिवसेनेच्या जागा कमी असतानाही त्यांच्याकडून जास्त जागांची मागणी होत होती. पुणे आणि पिंपरी चिंचवड येथे युती करण्यासाठी प्रयत्न करत आहे. उमेदवारी जागा बाबत मतमतांतर असू शकते. मात्र युती व्हावी, अशी भूमिका आहे. मात्र आता हा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री उदय सामंत आणि उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या स्तरावर होईल. स्थानिक पातळीवर एकमत झाले नाही म्हणून हा प्रश्न वरिष्ठ पातळीवर गेला आहे. शिवसेनेने १५० उमेदवारी अर्ज का दिले, असा प्रश्न आहे. शिवसेनेला १६ जागा देण्याची तयारी आहे.



### राजकारणामध्ये गुन्हेगारांना कोणतेही स्थान नसावे

» अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमधून गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांच्या कुटुंबियांना उमेदवारी दिली आहे. तसेच भाजपने आंबेगाव या प्रभागातून प्रतिभा चोरघे यांना उमेदवारी दिली असून त्या गुन्हेगारी कुटुंबातील असल्याचे आरोप होत आहेत. यासंदर्भात मोहोळ यांच्याकडे विचारणा केली असता ते म्हणाले,' राजकारणामध्ये गुन्हेगारांना कोणतेही स्थान नसावे. निवडणुकीसाठी अन्य पक्षांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना उमेदवारी दिली आहे. मात्र, आम्ही ती दिलेली नाही. कोणाला उमेदवारी दिली आहे, हे पुणेकर पहात आहेत. त्यामुळे मतपेटीमधून ते उत्तर देतील.'

# गर्दी वाढली पण शिस्त मोडली नाही; जिल्हाधिकाऱ्यांकडून यंत्रणेचे कौतुक

## प्रशासकीय नियोजनाचा विजय; 1260 बसेस आणि 4 हजार कर्मचाऱ्यांच्या बळावर 20 लाख अनुयायांचा प्रवास सुखकर.

**पुणे | प्रतिनिधी**

पेरणेफाटा येथील २०८ व्या शौर्यदिनानिमित्त विजयस्तंभास मानवंदना देण्यासाठी आलेल्या अनुयायांची गैरसोय होऊ नये, यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पीएमपीएलने केलेले संयुक्त नियोजन यशस्वी झाले.

यंदाच्या वर्षी गर्दीचा ओघ २० टक्क्यांनी वाढेल असा अंदाज वर्तवत प्रशासनाने शिक्रापूर आणि लोणीकंद येथे स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करून तेथून बसद्वारे प्रवासाची सोय केली होती. या उत्कृष्ट नियोजनामुळे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सर्व विभागांच्या कामगिरीवर कौतुकाची थाप मारली आहे. महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर यंदा मोठ्या संख्येने अनुयायी उपस्थित झाले होते.

प्रशासनाने भाविकांना उन्हाचा तडाखा बसू नये यासाठी बस थांब्यांवर छताची व्यवस्था केली होती. नगर बाजूकडे १० आणि चाकण बाजूकडे ५ असे स्वतंत्र बस थांबे उभारण्यात आले होते. पीएमपीएलच्या वतीने १२६० बसेसची व्यवस्था करण्यात आली होती,

ज्याद्वारे अनुयायांना पार्किंग स्थळापासून विजयस्तंभ, वढू बुद्रुक येथील छत्रपती संभाजी महाराज समाधी आणि गोविंद गोपाळ गायकवाड समाधी स्थळापर्यंत ने-आण करण्यात येत होती. अभिवादन करून बाहेर पडणाऱ्या भाविकांना तात्काळ बस उपलब्ध होत असल्याने अनुयायांनी समाधान व्यक्त केले.

कोणत्याही प्रकारची चेंगराचेंगरी किंवा वाहतूक कोंडी होऊ न देता भीम अनुयायांची ने-आण करण्यात आली. हे यश जिल्हा पोलीस, पीएमपीएल कर्मचारी आणि बस स्थानक उभारणाऱ्या बांधकाम विभागाच्या सांघिक प्रयत्नांचे असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी नमूद केले.

जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने शिरूर आणि हवेली तालुक्याच्या हद्दीत एकूण २१ उपचार केंद्र उभारण्यात आली होती. या केंद्रांच्या माध्यमातून सुमारे १० ते १२ हजार अनुयायांनी विविध आरोग्य सुविधांचा लाभ घेतला. प्रवासादरम्यान किंवा गर्दीत त्रास होणाऱ्या नागरिकांना तात्काळ उपचार पुरवण्यात आल्याची माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेश गोरे व राजेश कट्टीमनी यांनी दिली. शौर्यदिनानिमित्त विजयस्तंभास मानवंदना देण्यासाठी आलेल्या अनुयायांची गैरसोय होऊ नये, यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पीएमपीएलने केलेले संयुक्त नियोजन यशस्वी झाले.



### बारा हजारांवर अनुयायांनी घेतली आरोग्य सुविधा

» जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने शिरूर आणि हवेली तालुक्याच्या हद्दीत एकूण २१ उपचार केंद्र उभारण्यात आली होती. या केंद्रांच्या माध्यमातून सुमारे १० ते १२ हजार अनुयायांनी विविध आरोग्य सुविधांचा लाभ घेतला. प्रवासादरम्यान किंवा गर्दीत त्रास होणाऱ्या नागरिकांना तात्काळ उपचार पुरवण्यात आल्याची माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेश गोरे व राजेश कट्टीमनी यांनी दिली.

### पोलीस व पीएमपीएलने लढवली खिंड

» कोरेगाव भीमा बस स्थानकावरून नगर आणि चाकण बाजूला जाणाऱ्या ६३० बसेस आणि एकूण १२६० बसेसच्या सहाय्याने सुमारे चार हजार कर्मचाऱ्यांनी अहोरात्र सेवा दिली. कोणत्याही प्रकारची चेंगराचेंगरी किंवा वाहतूक कोंडी होऊ न देता भीम अनुयायांची ने-आण करण्यात आली. हे यश जिल्हा पोलीस, पीएमपीएल कर्मचारी आणि बस स्थानक उभारणाऱ्या बांधकाम विभागाच्या सांघिक प्रयत्नांचे असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी नमूद केले.

### अनुयायांनी समाधान व्यक्त केले

» ज्याद्वारे अनुयायांना पार्किंग स्थळापासून विजयस्तंभ, वढू बुद्रुक येथील छत्रपती संभाजी महाराज समाधी आणि गोविंद गोपाळ गायकवाड समाधी स्थळापर्यंत ने-आण करण्यात येत होती. अभिवादन करून बाहेर पडणाऱ्या भाविकांना तात्काळ बस उपलब्ध होत असल्याने अनुयायांनी समाधान व्यक्त केले.

# बारामतीला देशातील सर्वात सुंदर शहर बनवणार; नगराध्यक्ष सचिन सातव यांची ग्वाही

## बारामतीकरांच्या मूलभूत प्रश्नांना आता मिळणार न्याय; नगराध्यक्ष सचिन सातव यांनी स्पष्ट केला विकासाचा अजेंडा.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील नागरिकाला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा प्रयत्न असेल. मूलभूत सुविधा देण्यासोबतच बारामतीचा नावलौकीक वाढविण्यासाठी माझ्यासह सर्व माझे सहकारी नगरसेवक मनापासून काम करु, अशी ग्वाही नवनिर्वाचित नगराध्यक्ष सचिन सातव यांनी दिली.बारामती नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाचा कार्यभार सचिन सातव यांनी (दि.१) रोजी स्वीकारला. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही ग्वाही दिली.

याप्रसंगी मुख्याधिकारी पंकज भुसे, सर्व नगरसेवक उपस्थित होते.सातव म्हणाले, बारामतीच्या जनतेने माझ्यावर जो विश्वास टाकला आहे, तो माझ्यासाठी सन्मान आहेच. सोबतच मोठी जबाबदारी आहे. बारामतीला देशातील सर्वात सुंदर शहर करण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व खासदार सुनेत्रा पवार यांचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी आम्ही सर्व नगरसेवक जिवाचे रान करु.

अजित पवार यांनी जी संधी दिली आहे. त्याचे सोने करुन दाखविण्यासाठी पाच वर्ष झटून काम करु.मुलभूत प्रश्नांवर बोलताना सातव म्हणाले की, बारामती शहरातील नागरिकांच्या मुलभूत प्रश्नांना आमचे सर्वाधिक प्राधान्य असेल. स्वच्छता, पुरेसे पिण्याचे पाणी, खड्डेमुक्त रस्ते,

नव्याने होत असलेल्या उपनगरात भुयारी गटार योजना, घनकचरा व्यवस्थापन, पार्किंगची समस्या दूर करण्यासह आरोग्य व शिक्षण या मूलभूत सुविधांवर भर देणार आहे. अधिकाधिक डिजिटल सेवा, पारदर्शक प्रशासन आणि जलद निर्णयप्रक्रियेला आमचे प्राधान्य असेल.

मूलभूत सुविधा देण्यासोबतच बारामतीचा नावलौकीक वाढविण्यासाठी माझ्यासह सर्व माझे सहकारी नगरसेवक मनापासून काम करु, अशी ग्वाही नवनिर्वाचित नगराध्यक्ष सचिन सातव यांनी दिली.बारामती नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाचा कार्यभार सचिन सातव यांनी (दि.१) रोजी स्वीकारला. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही ग्वाही दिली.



### जलद निर्णयप्रक्रियेला आमचे प्राधान्य

» नव्याने होत असलेल्या उपनगरात भुयारी गटार योजना, घनकचरा व्यवस्थापन, पार्किंगची समस्या दूर करण्यासह आरोग्य व शिक्षण या मूलभूत सुविधांवर भर देणार आहे. अधिकाधिक डिजिटल सेवा, पारदर्शक प्रशासन आणि जलद निर्णयप्रक्रियेला आमचे प्राधान्य असेल.